ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# बौध्दिक संपदा अधिकार : एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. डी. बी. कोनाळे**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

**प्रस्तावना :**

मानवाने आपल्या बुध्दीने, प्रयत्नाने अनेक गोष्टींचा (माहिती, संकल्पना, सूत्र इ.) शोध लावला. या शोधामुळे तयार होणा-या वस्तू व सेवा यामुळे समाजाचे जीवन अधिकाधिक सुखी झाले आहे. वीजेचा शोध, वाफेच्या रेल्वे इंजिनाचा शोध यावरून अनेक उपकरणे मानवाने निर्माण केली. या उपकरणांचा वापर करून मानवाचे राहणीमान सुधारले, जीवन सुखी व संपन्न होण्यास मदत झाली. त्यामुळे सतत शोध लागत राहणे हे मानवाच्या व अर्थव्यवस्थांच्या विकासासाठी आवश्यक आहे. शोध लावण्यासाठी बौध्दिक संपदा हवी आणि ती सर्वांकडे नसते. ज्यांच्याकडे ती आहे त्यांनी तिचा उपयोग करावा, शोध लावावे अशा करिता शोधकर्त्याला त्यापासून काही आर्थिक लाभ मिळणे आवश्यक ठरते, किंवा लाभ मिळण्याची हमी असायला हवी यासाठी कायद्याने शोधकर्त्याला अधिकार असले पाहिजेत या अनुषंगानेच कायद्याने त्याने लावलेल्या शोधासाठी शोधकर्त्यास दिलेल्या अधिकारास बौध्दिक संपदा अधिकार असे म्हणतात. हे अधिकार कायद्याने दिलेले आहेत. त्यामुळे ते कायदेशीर तरतूदी व कार्यवाहीने अस्तित्वात येतात. अन्य कोणत्याही मालमत्तेप्रमाणे बौध्दिक संपदा अधिकार विकता येतात, भाडयाने देता येतात किंवा त्यासाठी परवानाही देता येतो.

स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी व विकसित होण्यासाठी उद्योगांना परंपरागत मालमत्तेबरोबरच बौध्दिक संपदांची आवश्यकता भासू लागली. त्या बौध्दिक संपदांना कायदेशिर अधिकार प्राप्त करून घेण्याची चढाओढ सुरू झाली. किंबहुना असे अधिकार असणे, ते वाढविणे हेच प्रगतीचे तंत्र सिध्द होऊ लागले. बौध्दिक संपदा अधिकार केवळ एका देशाच्या सीमेपुरता मर्यादित न राहता त्यांना जागतिक मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे या अधिकारांपासून होणारा आर्थिक लाभ जागतिक पातळीपर्यंत पोहोचला. व्यक्ती, समाज व शासन या तीनही पातळयांवर बौध्दिक संपदा अधिकाराचे फायदे लक्षात येऊ लागले. गुंतवणुकदारांना गुंतवणुकीसाठी परंपरागत मालमत्तेबरोबरच बौध्दिक संपदा अधिकार हे नवीन दालन आकर्षित करू लागले.

बौध्दिक संपदा अधिकार 1967 सालच्या जागतिक बौध्दिक संपदा संघटना स्थापना करण्याच्या अनुषंगाने, जगभरातल्या बौध्दिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी जागतिक बौध्दिक संपदा संघटना (WTO) याची स्थापना झाली. संघटनेचे कामकाज 26 एप्रिल 1970 रोजी सुरू झाले. त्याचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथे आहे. जागतिक बौध्दिक संपदा दिन दरवर्षी 26 एप्रिल रोजी साजरा केला जातो. 2020 साली हा दिवस इनोव्हेट फॉर ए ग्रीन फ्यूचर या संकल्पनेखाली साजरा करण्यात येत आहे. या बौध्दिक संपदा दिनाची सुरूवात सन 2000 साली जागतिक बौध्दिक संपदा संघटना (WTO) या संस्थेनी केली आहे. बौध्दिक संपदा अधिकार केवळ एका देशाच्या सीमेपुरता मर्यादित न राहता त्याना जागतिक मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे या अधिकारांपासून होणारा आर्थिक लाभ जागतिक पातळीपर्यंत पोहोचला. विकसित देशांना तो लवकर समजला. त्यांनी आपआपल्या देशात त्यानूसार कायद्यांची रचना केली. विकसनशील देशांना त्यांचा लाभ समजण्यास थोडा अवधी लागला. परंतु जागतिक व्यापार

संघटनेच्या (WTO) ट्रिप्स (TRIPS)Trace Related Aspects of Intellectual Property Rights करारानंतर 1995 साली बौध्दिक संपदा अधिकारांकडे विकसनशील देशही सजगतेने पाहू लागले. कराराची पूर्तता करण्यासाठी म्हणून का होईना विकसनशील देशांनी आपल्या बौध्दिक संपदाविषयक कायद्यात बदल/दुरूस्त्या केल्या. भारताला बासमतीचे, कडुलिंबाचे, हळदीचे व कार्ल्याचे पेटंट गेल्याचे समजले भारतीयांनी त्याला आव्हान दिले व कार्ल्याच्या पेटंट वगळता हळद, कडुलिंब व बासमती तांदूळाचे पेटंट यासंबंधीचा लढा जिंकला त्यानंतर भारतात या अधिकारांविषयी अधिक जागरूकता निर्माण झाली आहे.

बौध्दिक संपदा अर्थ आणि व्याख्याः शोध घेण्याची व शोध लावण्याची मानवाची क्षमता विशेष आहे. तीच त्याची बौध्दिक संपदा आहे. एखादी संकल्पना, भावना किंवा कृती सादर करण्याची, व्यक्त करण्याची व साठवून ठेवण्याची अभिनव पध्दत आणि त्यातील कसब म्हणजेच बौध्दिक संपदा होय. मानवी मनाच्या व बुध्दिच्या मदतीने निर्माण झालेली मालमत्ता म्हणजे बौध्दिक संपदा होय. तिचा अविष्कार, औद्योगिक क्षेत्रात, विज्ञान क्षेत्रात, साहित्य किंवा कलेच्या क्षेत्रात होतो. मानवाचे मन आणि बुध्दी यातून निर्माण झालेल्या बाबींविषयी कायदेशीर विचार करणे बौध्दिक संपदेत अभिप्रेत आहे. वाणिज्य घडामोडीत वापरता येणारे शोध तसेच चिन्हे, नावे, चित्रे, आकृत्या व संकल्पचित्रे याबरोबरच संगीत, साहित्य आणि कलाविषयक निर्मिती ही सर्व बौध्दिक संपदा मानली जाते. जागतिक बौध्दिक संपदा संगठन यांनी बौध्दिक संपदेची व्याख्या फारच व्यापक केली आहे. बौध्दिक संपदेत खालील बाबींविषयीच्या अधिकारांचा समावेश होतो.

1) साहित्य, कला व शास्त्रीय कार्य.

2) कला सादर करणारे कलाकार, फोनोग्राम्स आणि ध्वनिक्षेपित करणा-यांची अदा / सादरीकरण.

3) मानवी प्रयासाच्या सर्व क्षेत्रातील शोध.

4) शास्त्रीय शोध.

5) औद्योगिक संकल्पचित्रे / नकाशे.

6) व्यापारचिन्हे, सेवाचिन्हे.

7) अयोग्य / अन्याय स्पर्धेपासून संरक्षण.

8) औद्योगिक, शास्त्रीय, साहित्य किंवा कला क्षेत्रातील बौध्दिक कामामुळे निर्माण होणारे इतर सर्व अधिकार.

शारीरिक मेहनत अथवा श्रमातून निर्माण न होता बौध्दिक श्रमातून निर्माण होणाऱ्या मालमत्तेला बौध्दिक संपदा म्हणतात.

बौध्दिक संपदा अधिकाराचे प्रकार / वर्गीकरण

**बौध्दिक संपदा**

**औद्योगिक क्षेत्र**

- पेटंट
- वस्तू पेटंट
- प्रक्रिया पेटंट
- व्यापारी चिन्ह / सेवा चिन्ह
- औद्योगिक संकल्प चित्रे
- लेआउट डिझाइन्स
- भौगोलिक विशेषता
- गुप्त माहिती
- इंटिग्रेटेड सर्किटस्

**साहित्य व कला क्षेत्र**

- कॉपीराइट
- इतर
- कलाकारांचे सादरीकरण
- प्रक्षेपकांचे प्रक्षेपण

**इतर क्षेत्रे**

- संगणकाची आज्ञावली

- वनस्पतींची विविधता
- सूक्ष्म जैविक संपदा
- परंपरागत ज्ञान

वरील बौध्दिक संपदेच्या वर्गीकरणानूसा पेटंट, कॉपीराइट, व्यापरी चिन्हे,, औद्योगिक संकल्प चित्रे, भौगोलिक विशेषता, गुप्त माहिती, नवीन जैविक संपदेचे संरक्षण, लेआउट डिझाइन्स, इंटिग्रटेड सर्किटस् इ. प्रकार लक्षात येतात. या सर्व बौध्दिक संपदांच्या संरक्षणासाठी भारतात खालीलप्रामणे कायदे अस्तित्वात आहेत.

**बौधिक संपदा अधिकार संरक्षणासाठी भारतातील कायदे**

1) कॉपीराइट ॲक्ट, 1957

2) पेटंट ॲक्ट, 1970 संशोधित 2002, संशोधित 2005

3) ट्रेडमार्क्स ॲक्ट, 1999

4) जिऑग्राफिकल इंडीकेशन्स गुडस् ॲक्ट, 1999

5) डिझाइन्स ॲक्ट 2000

6) प्रोटेक्शन ऑफ प्लांट व्हरायटीज ॲन्ड फारमर्स राइटस् ॲक्ट 2001.

**पेटंट(Patents):** बौध्दिक संपदा अधिकारापैकी महत्वाचा एक अधिकार म्हणजे पेटंट होय. औद्योगिक अधिकारात याची गणना केली जाते. पेटंट मिळविण्यासाठी शोधकर्त्याने स्वतः शोध लावलेला असणे आवश्यक असते. नाविण्य असणे व शोधाची उपयोगिता असणे या दोन पायाभूत बाबींवर पेटंट मिळणे शक्य आहे. अगोदरच माहित असलेल्या गोष्टीत केवळ सुधारणा करून किंवा दुरूस्ती करून पेटंट मिळत नाही. एका शोधासाठी एकच पेटंट दिले जाते. पेटंट मिळविण्यासाठी खालील प्रक्रिया पूर्ण करावी लागते.

1) पेटंट मिळविण्यासाठी अर्ज करणे

2) संबंधित कार्यालय या अर्जाची छाननी करते व पेटंट परीक्षकाकडे अहवाल पाठविला जातो.

3) अहवालानंतर तपासणीअंती परीक्षक हा अर्ज पेटंट नियंत्रकाकडे पाठवितो.

4) पेटंट नियंत्रक संबंधित पेटंट (शोधाचा तपशील स्वीकारला असे ) शासकीय राजपत्रातून प्रसिध्द केले जाते.

5) पेटंटच्या दाव्यास हरकतीसाठी चार महिन्याचा कालावधी दिला जातो.

6) शोधकर्त्याचे नाव पेटंट नोंदवहीत दाखल करणे

7) पेटंट प्रदान करणे

**पेटंटचा कालावधी :** ज्या शोधचे सार हे अन्नपदार्थ, औपध किंवा औषधी द्रव्य म्हणून वापरता येणारे असेल अशा शोधाचे पेटंअ हे प्रदान केल्यापासून 5 वर्षे किंवा पेटंटचा अर्ज केल्यापासून 7 वर्षे (जो कालावधी कमी असेल) इतक्या काळासाठी लागू असतो. इतर सर्व शोधांसाठी पेटंटचा कालावधी हा 20 वर्षाचा असतो.

**पेटंटची उदाहरणे :** अमेरिकेले नोंदविलेले हळदीचे पेटंट कायदेशीर लढयाने भारताने मिळविले, औषधी पेटंट इ.

**लेखाधिकार (Copyrights):** लेखनकृती व कलाकृती सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने त्या लेखकाला अथवा कलाकाराला कायद्याने दिलेला अधिकार म्हणजे कॉपीराइट होय. यात काव्य, कथा, कादंब-या, नाटके, इतर साहित्य, सिनेमा, नृत्य, संगीत गायन, ध्वनिमुद्रण, चित्र, पेंटिंग्ज, मुर्ती, फोटोग्राफस, संगणकाची आज्ञावली (सॉफटवेअर), रेडीओ व दूरचित्रवाणीचे प्रसारण इत्यादींचा समावेश केला जातो. प्रकाशित पुस्तकावर © असे चिन्ह असते, ते कॉपीराइटचा अधिकार दर्शविते. हा अधिकार ज्याच्याकडे आहे त्याच्या परवानगीशिवाय या साहित्याचा उपयोग करता येत नाही. कॉपीराइटचा कालावधी हा 60 वर्षे करण्यात आला आहे.

**व्यापारचिन्हे (Trademark):** एखादया माणसाची किंवा उत्पादकाची वस्तू किंवा सेवा इतरांपासून वेगळी ओळखता येणे सहज शक्य होईल यासाठी चित्रात दाखविता येणारी एखादी खूण किंवा चिन्ह म्हणजे ट्रेडमार्क होय. यालाच ब्रॅंड नेम असेही म्हणतात. ट्रेडमार्कमुळे वस्तू लोकप्रिय होतात. ग्राहकांच्या मनात व नजरेत त्या वस्तू ट्रेडमार्कमुळे कायमच्या कोरल्या जातात. इतर उत्पादकांच्या मालापासून विशिष्ट माल वेगळा करण्यास ट्रेडमार्कची मदत होते. उत्पादकाला आपल्या मालाची जाहिरात व विक्री करण्यासाठी ट्रेडमार्क उपयोगी ठरतो. ट्रेडमार्क ही वस्तूची, दर्जाची, मालकाची, परंपरेची ओळख असते. वस्तूचे नाव, गुणवत्ता, विश्वासार्हता व टिकाउपणा या तीन वैशिष्ट्यांशी ट्रेडमार्क निगडीत असतो. पारले-जी, ब्रिटानिया, अमूल, बजार, रिलायन्स, किर्लोस्कर, चितळे, एल.आय.सी. इ. ट्रेडमार्कचा कालावधी हा नोंदणी केल्यापासून सुरूवातीला 10 वर्षासाठी अधिकार मिळतो त्यानंतर वेळोवेळी योग्य ती मुदतवाढ अर्ज करून व फि भरून अमर्याद काळासाठी मुदतवाढ मिळते.

**भौगोलिक विशेषतादर्शक चिन्ह (Geographical Indications) :** कांही उत्पादने ज्या भौगोलिक प्रदेशात तयार होतात त्यांना त्या भौगोलिक प्रदेशाच्या नावाने एक वेगळी ओळख मिळते. उदा. म्हैसूर सिल्क, कोल्हापुरी चप्पल, दार्जिलिंग चहा, पुणेरी पगडी, पैठणी साडी, काश्मीरी केसर इ. भौगोलिक विशेषता ही शेती उत्पादनाबाबत, नैसर्गिक वस्तूबाबत व हस्त कौशल्याने किंवा कारखान्यातून तयार झालेल्या वस्तूंबाबत असते यात खाद्यपदार्थांचाही समावेश होतो. ट्रिप्स करारानूसार आपल्या देशातील भौगोलिक विशेषतेशी त्या देशाच्या कायद्याने संरक्षण दिले नाही तर इतर देश ती भौगोलिक विशेषता मान्य करणार नाही त्यांच्यावर तसे बंधन घालता येणार नाही. भारताने 1999 मध्ये जिऑग्राफिकल इंडीकेशन्स गुडस् (नोंदणी आणि संरक्षण) ॲक्ट हा कायदा करून भौगोलिक विशेषतांची नोंदणी व संरक्षण यात पुढाकार घेतला. ट्रिप्स कराराच्या अटी व शर्ती जागतिक व्यापार संघटनेच्या सर्व सभासद देशांना लागू आहेत. त्यामुळे एखाद्या देशात त्या देशातील एखाद्या भौगोलिक विशेषतेला संरक्षण मिळाले नाही किंवा देलेले संरक्षण काढून घेतले किंवा ते वापरात नसेल तर तसे संरक्षण जागतिक व्यापार संघटनेच्या इतर सभासद देशातही मिळत नाही.

**गुप्त माहितींचे संरक्षण (Trade Secrets):** कांही वस्तू किंवा पदार्थ तयार करीत असताना अशी कांही प्रक्रिया किंवा सूत्र वापरले जाते की, ती वस्तू किंवा पदार्थ तशाच इतर वस्तू किंवा पदार्थापेक्षा दर्जाने, रंगाने, रूपाने, चवीने, वजनाने वेगळा होतो. म्हणून त्या प्रक्रिया किंवा सूत्राला ट्रेड सिक्रेट असे म्हणतात. उदा. कोका कोला फॉर्म्यूला, ग्राहकांची यादी, उत्पादनाची प्रक्रिया, हिशोबाची माहिती, कामगारांचे रेकॉर्ड, पुरवठादारांची यादी, उद्योगाची आर्थिक स्थिती इ. एखादया व्यक्तीकडे किंवा संघटनेकडे असलेली माहिती जी गुप्त आहे म्हणून तिला व्यापारी मूल्य आहे आणि ती माहिती त्या व्यक्तीच्या किंवा संघटनेच्या नियंत्रणात आहे. तसेच त्यांनी ही माहिती गुप्त ठेवणे अपेक्षित व आवश्यक आहे. अशा माहितीचे संरक्षण होणे व्यापारी दृष्टीने आवश्यक आहे. या माहितीत व्यापारी गुपित, खासगी माहिती, सूत्र/नियम, नमुना संग्रह, कार्यक्रम, युक्ती/योजना, तंत्र, पध्दत, किंवा प्रक्रिया यांचा समावेश होतो.

औद्योगिक संकल्पचित्र (Industrial Design): एखादया उत्पादनाला ग्राहकाची पसंती ही त्या उपत्पादनाच्या उपयोगितेने मिळते तशीच ती त्या उत्पादनाच्या डिझाइनमुळे व त्या उत्पादनाच्या वेष्टनाच्या बाहय दृश्यरूपानेही मिळते. म्हणूनच उत्पादनाच्या डिझाइन एवढेच म्हत्व त्या उत्पादनाच्या वेष्टनाच्या डिझाइन यासाठीही असते. रंगसंगती, प्रकार, आकार आणि सुशोभिकरण या सर्वांना एकत्रितपणे डिझाइन असे म्हणता येईल. या डिझाइनमुळे वस्तूची विक्री वाढते म्हणून उत्पादकांच्या दृष्टीने ही एक संपदाच आहे.

डिझाइनची कल्पना करणे व एखाद्या औद्योगिक प्रक्रियेने किंवा साधनाने ते डिझाइन प्रत्यक्षात उतरविणे ही बौधिक संपदा आहे. उदा. कारचे डिझाइन, मोबाईलचे डिझाइन, बॅगचे डिझाइन इ.

**रोपांच्या नवीन जाती / नमुन्यांना संरक्षण (Protection of New Varieties of Plants):** कृषी क्षेत्रात संशोधन व्हावे, त्यातून नवनवीन जातींचा विकास व्हावा, शोधकर्त्यांना संरक्षण मिळावे, आर्थिक लाभ मिळावा आणि संशोधनाचा लाभ अन्य कोणी घेऊ नये, शेतक-यांच्या परंपरागत अधिकारांचे संरक्षण व्हावे यासाठी 2001 मध्ये (The Protection of Plant Varieties & Farmers Rights Act) हा कायदा भारतात करण्यात आला आहे. संशोधक, नवीन जातींच्या / नमुन्यांच्या रोपांची लागवड करणारा आणि प्रत्यक्ष त्या जातींपासून शेती करणारा या तीनही वर्गांच्या हिताचे रक्षण व्हावे हा या कायद्याचा उद्देश आहे. हा अधिकार प्राप्त करण्यासाठी नोंदणी केल्या पासून रोपाच्या नवीन जातीचे / नमुन्याचे प्रमाणपत्र झाडे व वेलींना 9 वर्षे व इतर पिकांसाठी 6 वर्षे वैध असते. यानंतरच्या काळासाठी योग्य ती फिस भरून नूतनीकरण करता येते परंतू एकुण सर्व वैध कालावधी हा झाडे व वेलींच्या बाबतीत 18 वर्षे व इतर पिकांच्या बाबतीत 15 वर्षापेक्षा जास्त नाही.

**सारांश :** बौध्दिक संपदा अधिकार कायद्यांचा मुख्य उद्देश हा वेगवेगळया प्रकारची बौध्दिक संपदा निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. एखादया गोष्टीचा आर्थिक फायदा मिळणे किंवा तिचे श्रेय मिळणे यातून नवनवे शोध, कलाकृती यांच्या निर्मितीस प्रोत्साहन मिळते हे यामागील तत्व आहे. शोधकर्त्याने शोध लावण्यासाठी वापरलेली बुध्दी, कसब, घेतलेले परिश्रम, खर्च केलेला वेळ व पैसा यांची भरपाई करणे व त्याची शोध लावण्याची वृत्ती वाढीस लावणे याकरीता त्याला आर्थिक लाभ मिळवून देणे हा बौध्दिक संपदा अधिकाराचा उद्देश आहे. यामुळे शोध लावणा-या व्यक्तीस आर्थिक लाभ मिळतो तसेच त्याने केलेल्या कार्याचे श्रेयही त्यास मिळते. आर्थिक लाभ व श्रेय मिळण्याची हमी असल्याने नवनवीन शोध व कलाकृती निर्माण होतात व याचा लाभ शोधकर्त्यास होतोच त्याच बरोबर समाजासही होतो. समाजातील लोकांना भौतिक सोयी सुविधा प्राप्त होवून त्यांचे राहणीमान उंचावते. यामुळे तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी आणि आर्थिक व सामाजिक विकासासाठी बौध्दिक संपदा ही एक विश्वात एक शक्ती मानली जाते. जागतिक बाजारपेठेत स्पर्धा टिकवून ठेवणे व ती सतत वाढविणे हे बौधिक संपदा आधिकरामुळे शक्य झाले आहे.

***संदर्भः***


1. *गोविलकर, वि. म. (2011). बौध्दिक संपदा अधिकार, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.*
2. *पाटणी, आर. के., आणि पुरोहित अंजली, (2018). भारत में बौध्दिक संपदा अधिकारों के मुददे एवं चुनौतियॉं. इंटरनॅशनल जर्नल ऑफ अडव्हान्सड् रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट, 84-87.*
3. *https://www.google.com/amp/s/www.loksatta.com/career-vrutantta-news/article-about-intellectual- property-rights-and-how-1804112/lite/*
4. *https://m.marathi.thewire.in/article/boudheek-sampada-adhikar-mhanje-kay/3482*
5. *http://intolegalworld.com/2017/07/30/brief-analysis-intellectual-property-law-india/*
6. *The Institute of Company Secretaries of India, Study material, Intellectual Property Rights-Law and Practice, module 3, Elective Paper 9.4, New Delhi.*
7. *https://www.civilsercieindia.com/subject/General-Studies/notes/issues-relating-to-intellectual-property-rights. html.*